**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा केंद्र सरकारचा अंदाज

- अंबरनाथ आणि अकोट नगरपरिषदेतल्या युतीवरुन भाजपा आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते स्थानिक कार्यकर्त्यांवर नाराज

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इस्त्राइलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा

**आणि**

- आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेतले बांग्लादेशाचे सामने भारताबाहेर खेळवण्याची बांग्लादेश क्रिकेट मंडळाची मागणी ICC नं फेटाळली

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धिदर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज केंद्र सरकारनं वर्तवला आहे. यापूर्वी हा दर साडे ६ टक्के राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता.

चालू आर्थिक वर्षात देशाचं ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न २०१ लाख कोटी रुपयांहून अधिक होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात हे उत्पन्न १८८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा सरकारचा अंदाज आहे.

उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रातल्या वाढीमुळं आर्थिक वृद्धिदर ७ टक्क्यांच्या पलीकडे जाऊ शकतो, असं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जैविक डांबराचा व्यावसायिक पातळीवर उत्पादन करणारा भारत हा जगातला पहिला देश ठरल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. धान्यातला काडी-कचरा जाळून टाकण्यातून होणारं प्रदूषण या तंत्रज्ञानामुळे टाळता येईल, असं गडकरी म्हणाले. नवी दिल्लीत CSIR तंत्रज्ञान हस्तांतरण सोहोळ्याच्या कार्यक्रमात गडकरी बोलत होते.

<><><><><>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं रस्ते निर्मितीत गिनीज विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. २९ किलोमीटरचा रस्ता सलग २४ तासांत उभारण्याचा विक्रम प्राधिकरणानं केला आहे. यासाठी १० हजार मेट्रिक टनाहून अधिक डांबरयुक्त काँक्रीटचा वापर झाला. ३४३ किलोमीटर लांबीच्या या बंगरुळु-कडाप्पा-विजयवाडा महामार्गावर हा विश्वविक्रम झाला.

<><><><><>

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी लोकसभेच्या सभापतींनी समिती स्थापन करण्यावर न्यायाधीशांची चौकशी कायद्यातल्या तरतुदींनुसार कोणतीही बंदी नाही, असं मत सर्वोच्च न्यायालयानं आज नोंदवलं. मात्र, ज्या पद्धतीनं सभापती ओम बिर्ला यांनी ही समिती स्थापन केली, त्यात काही त्रुटी दिसत आहेत, असंही न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठानं नमूद केलं. ही संपूर्ण प्रक्रियाच रद्द करावी, इतक्या या त्रुटी मोठ्या आहेत का, हे तपासू, असंही पीठानं स्पष्ट केलं.

<><><><><>

२०२५ हे वर्ष भारतासाठी सुधारणांचं वर्ष ठरलं. कामगार कायदे, कररचनेत बदल, बंदरांचं आधुनिकीकरण, परकीय गुंतवणूक आणि मुक्त व्यापार करार अशा

महत्त्वाच्या सुधारणा झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतीमान झाली. यामुळे भारताचं सकल राष्ट्रीय उत्पादन ८ पूर्णांक २ दशांश टक्क्यापर्यंत वाढलं.

**<><><><><>**

अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपानं काँग्रेसची तर अकोट नगरपरिषदेत भाजपानं MIM शी युती केली आहे. याप्रकरणी भाजपा आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथल्या नगरपरिषदेत शिवसेनेला डावलून भाजपानं, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर अंबरनाथ विकास आघाडी तयार केली आहे. अकोला जिल्ह्यात अकोट इथं एमआयएम बरोबर समझोता केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली असून कोणत्याही परिस्थितीत हे समझोते खपवून घेणार नाही असं स्पष्ट केलं आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या प्रकरणी अकोटचे आमदार प्रकाश भारसाखळे यांच्याकडून खुलासा मागवला आहे. भाजपाच्या स्थानिक नेत्यांचा हा निर्णय चुकीचा असल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली आहे.*

*काँग्रेसनं अंबरनाथमधल्या पक्षाच्या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केलं आहे. कार्यकारिणी बरखास्त करण्याचा तसंच कार्यकारिणीच्या अध्यक्षांना निलंबित करण्याचा आदेश प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. भाजपासोबतची युती ही चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इस्त्राएलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांच्याशी दूरध्वनीवरुन उभयपक्षी सहकार्याबाबत चर्चा केली. लोकशाही मूल्य, परस्पर विश्वास आणि भविष्याचा वेध या तत्त्वांवर आधारित नातेसंबंध दोन्ही देशांदरम्यान वाढवण्यासाठीचे मार्ग या चर्चेत पुढे आले. सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुता धोरण आणि दहशतवादी कारवायांना प्रतिरोध याविषयीच्या वचनबद्धतेचा दोन्ही नेत्यांनी पुनरुच्चार केला. त्यांनी परस्परांना नवीन वर्षाच्या शुभेच्छाही दिल्या.

**<><><><><>**

जेम्स लेन यानं लिहिलेल्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्यासंदर्भात काही अपमानास्पद उल्लेख होते. याप्रकरणी छत्रपती उदयनराजे भोसले यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचनं ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेसला वृत्तपत्रात माफीनामा प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेसनं कालच्या वृत्तपत्रात दिलगिरी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांना नोटीस पाठवली आहे. डॉ. सेन सध्या परदेशात असल्याने बोलपूरमधे शांतिनिकेतन इथल्या त्यांच्या घरी नोटीस पाठवण्यात आली आहे. त्यांच्या मतदार नावनोंदणी अर्जात काही त्रुटी आढळल्याने सुनावणीला हजर राहण्याची नोटीस पाठवल्याचं बूथ पातळी अधिकाऱ्यांनी सांगितलं.

तृणमूल काँग्रेसने या प्रकाराचा निषेध केला आहे. बंगालच्या जनतेचा अपमान करण्यासाठी जाणूनबुजून असे प्रकार केले जात असल्याचा आरोप तृणमूलचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी केला आहे. भाजपा आणि निवडणूक आयोगाने हा आरोप फेटाळला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण एका गुंतवणूक योजनेची जाहिरात करत असल्याचा समाजमाध्यमावर फिरणारा व्हिडिओ खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. सदर व्हिडिओ एआयनं तयार केलेला असल्याचं पत्र सूचना कार्यालयाच्या फॅक्ट चेक युनिटनं म्हटलं आहे. अशा कोणत्याही योजनेची जाहिरात अर्थमंत्र्यांनी केलेली नाही. नागरिकांनी अशा

प्रकारच्या कोणत्याही दाव्यांची सत्यासत्यता अधिकृत पोर्टल्सवरून किंवा संकेतस्थळांवरून पडताळून पाहावी, असं आवाहन पीआयबीनं केलं आहे.

<><><><><>

महिला बचत गटाच्या सदस्यांना आता पोस्टाच्या इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या सुविधांचा लाभ घेता येईल. त्यांना पैसे हस्तांतरणाची सुविधा, POS मशीन, टॅब आणि प्रशिक्षण दिलं जाईल. यासाठी केंद्रीय संचार मंत्रालयानं कृषी आणि ग्रामविकास मंत्रालयासोबत सामंजस्य करार केला आहे. याशिवाय शेतकऱ्यांना किटकनाशकांच्या दर्जाची तपासणी करण्यासाठी पोस्टाच्या सुविधेचा लाभ घेता येईल. यामुळं पूर्वी १० - १५ दिवसात होणारी प्रक्रिया आता २-३ दिवसात पूर्ण होऊ शकेल, असं केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.

<><><><><>

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेतले बांग्लादेशाचे सामने भारताबाहेर खेळवण्याची बांग्लादेश क्रिकेट मंडळाची मागणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मंडळानं फेटाळली आहे. त्याऐवजी बांग्लादेशानं उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर तोडगा काढण्याची तयारी आयसीसीनं दाखवली आहे, असं बांग्लादेश क्रिकेट मंडळानं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. आयसीसीनं मागणी फेटाळल्यावरही बांग्लादेश त्यांच्या भूमिकेवर ठाम आहे. आम्हाला ही विश्वचषक स्पर्धा खेळायची आहे. पण भारतात खेळलो तर बांग्लादेशाची सुरक्षा, सन्मान धोक्यात येईल, असं बांग्लादेशाचं म्हणणं आहे. ही भूमिका एक-दोन दिवसात आयसीसीला कळवणार असल्याचं बांग्लादेश क्रिकेट मंडळानं म्हटलं आहे. टी-२० विश्वचषक येत्या ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून बांगलादेशचे चार सामने कोलकाता आणि मुंबईत होणार आहेत.

<><><><><>

मलेशिया खुल्या सुपर वन थाउजंड बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत भारताची पी. व्ही. सिंधू, तर पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. सिंधुचा पुढचा सामना जपानच्या तोमोका मियाझाकी हिच्याशी होणार आहे.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनीषा क्रस्टो, तर महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोड्यांना मात्र पराभव पत्करावा लागला. ऋतुपर्णा आणि श्वेतपर्णा पांडा याही पहिल्याच फेरीत बाद झाल्या.

**<><><><><>**

अमेरिकेला पळून गेलेला कुख्यात गुन्हेगार अमन भैंसवालला भारतात आणण्यात यश आलं आहे. कुख्यात लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य अमन खून, दंगा आणि गुन्हेगारी कट रचण्याच्या विविध प्रकरणात हरियाणा पोलिसांना हवा होता. दिल्ली विमानतळावर आज हरियाणा पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं.

**//<><><><><>//**